# पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम : एक समाजशास्त्रीय विश्लेषण

**प्रा. व्ही. एन. कांबळे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद*

**प्रस्तावना**

भारतीय पारंपरिक समाजात स्त्रियांना अनन्यसाधारण महत्त्व होते. कारण, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांनी बंदीस्त जीवन जगावे असे अलिखित संकेत आहेत. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम होत गेला. 18 व्या शतकात राजराम मोहन रॉय व महात्मा फुलेंनी स्त्री विकासाला चालना दिली. तसेच 19 व्या शतकात राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रियांना पुरुषांप्रमाणे हक्क आणि अधिकार देण्यासाठी आंदोलने केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री विकासाला प्राधान्य दिले. स्वातंत्र्योत्तर भारताने लोकशाहीवर आधारित असलेल्या घटनेचा स्वीकार केला. त्यामुळे स्त्री विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत केल्या. विशेषतः 2016 मध्ये तत्कालीन भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण समाजातील महिलांचे आरोग्य सक्षम रहावे याकरिता पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेची सुरुवात केली.

आजही भारतात दहा कोटी कुटुंबाकडे स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन नाही. ग्रामीण भारतातल्या 67% पेक्षा जास्त कुटुंब आजही चुलीवरच स्वयंपाक करतात. या घरातल्या स्त्रियांना लाकुड, कोळसा आणि शेणाच्या गोवऱ्या अशा पारंपरिक इंधनावरच अवलंबून रहावे लागते. हे इंधन गोळा करण्यासाठी द्यावा लागणारा वेळ ऊन, थंडी, पावसाची फिकिर न करता, त्यासाठी करावी लागणारी पायपीट आणि सगळयात दुर्दैवी म्हणजे या इंधनामुळे जडणारे डोळे, श्वसन, फुफ्फुसाचे अनेक दुर्धर आजार हे सगळे या स्त्रियांना सहन करावे लागत होते. हे लक्षात घेऊन पंतप्रधान यांनी उत्तरप्रदेशातल्या बलियातून पंतप्रधान उज्ज्वला योजनेची घोषणा केली. पंतप्रधानांनी 2019 अखेरपर्यंत 3 वर्षात दारिद्रय रेषेखालील पाच कोटी स्त्रियांना एल.पी.जी.जोडण्या मोफत देण्याचा संकल्प केला. आज किमान आठ कोटी कुटुंबांना एल.पी.जी.गॅस कनेक्शन दिलेले आहे. एल.पी.जी.गॅस कनेक्शनचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर कोणते परिणाम झालेत यावर प्रस्तुत शोधनिबंधात प्रकाश टाकण्यात येत आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा

पीलई ए., अम्माल एस. (2017) “**Review Article an Economic Assessment to Pradhan Mantri Ujjwala Yojana Scheme of India's Central Government.**” यांनी या विषयावर संशोधन केलेले आहे. सदरील अध्ययनात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचे आर्थिक दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण आर्थिक घटकात उर्जा व इंधन महत्वपूर्ण घटक समजला जातो. इंधन आर्थिक विकासाला गती देण्याचे कार्य करतो. देशाच्या आर्थिक विकासासाठी उर्जेची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे मुख्य निरीक्षण अधोरेखित केले.

गोल्ड सी. एफ. उरपेलिन जे. (2018) यांनी “**LPG as a cooking fuel: Adoption, use, and impact in rural India energy Policy.**” यांनी प्रस्तुत विषयावर अध्ययन केले आहे. ग्रामीण भारताता स्वच्छ स्वयंपाक इंधन एलपीजीचा अवलंब, वापर आणि परिणामांचे मुल्यांकन केलेले आहे. 2014-2015 या आर्थिक वर्षात सर्वेक्षण केले आहे. सर्वेक्षणावर आधारित हा अभ्यास आहे. स्वच्छ इंधनाची परिस्थिती अत्यंत कमी असलेल्या सहा राज्यातील 85000 कुटुंबाकडून मिळालेल्या प्रतिक्रया. वर्णनात्मक आकडेवारी आणि सहसंबंध लागू करुन सध्याचे मूल्यामापन केलेले आहे. अभ्यासाच्या निष्कर्षावरुन असे दिसून आले आहे की, ग्रामीण भारतातीमध्ये **LPG** चा अवलंब करण्याच्या वाढीमध्ये इंधन खर्च आणि इंधन स्टॉकिंग या समस्या आहेत. निष्कर्षात असेही सुचविले आहे की, **LPG** शी संबंधित असल्याचे सकारात्मकपणे समजतात.

स्वीन एस. एस., मिश्रा. पी. (2019) यांनी, “**Determinants of adoption of cleaner cooking energy : Experience of the pradhan mantri ujjwala yojna in rural Odisha. Journal of**

**cleaner production.**" या नावाचा संशोधनात्मक लेख प्रकाशित केला आहे. भारतातील ग्रामीण ओडिशात एलपीजी चा स्वच्छ उर्जा म्हणून स्वीकार करण्यावर प्रभाव टाकणारे निर्धारक स्पष्ट केले आहे. सदरील अभ्यासात वर्णणात्मक आकडेवारीचा अंदाज घेऊन आणि मॉडेल्सचा वापर करुन अवलंबित चलाची गणना करुन प्रतिसादाचे विश्लेषण केले.

बरुआ एस. के., अग्रवाल एस. के. (डिसें. 2018) "**Lighting up lives through cooking gas and transforming society**" बरुआ. एस. के. यांनी प्रधानमंत्री उज्वला योजनेचा प्रवास, भारतीय स्वयंपाक घरांना स्वच्छ स्वयंपाक इंधन पूरवण्यासाठी देशातील सर्वात मोठया सामाजिक परिवर्तन कार्यक्रमापैकी एक आहे. स्वयंपाकाच्या गॅस व्दारे जगणे आणि परिवर्तन शील समाज यासदर्भात केस स्टडिव्दारे अभ्यास केला आहे.

मिश्रा आर. के., सिंग उदम, मिश्रा मोनिका (2019) यांनी, "**Impact of ujjwala yojana on Rural women's Life**" या शिर्षकाचा संशोधनात्मक लेख जर्नल ऑफ ॲडवहान्सेस आणि स्कॉलरली रिसर्च इन अलाइड एज्युकेशनमध्ये बहुविध शाखीय शैक्षणिक संशोधन यामध्ये प्रकाशित केला. उज्ज्वला योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर होणारा परिणाम या अनुशंगाने प्रकाश टाकला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश**

१. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा अभ्यास करणे.
२. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा महिलांच्या आर्थिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा महिलांच्या आरोग्यावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा महिलांच्या सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितकृत्ये**

१. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेमुळे महिलांचे आर्थिक जीवन उन्नत होत आहे.
२. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेमुळे महिलांचे आरोग्य सक्षम होत आहे.
३. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेमुळे महिलांची सामाजिक उन्नती होत आहे.
४. पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजना महिलांसाठी परिणामकारक ठरत आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाचे लिखाण करण्यासाठी तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. तथ्य म्हणजे घटना जशी आहे तशी पाहणे होय. हे लक्षात घेऊन तथ्य संकलनाचे कार्य करावे लागते. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाच्या दोन पद्धती आहेत. प्राथमिक तथ्य संकलन आणि द्वितीय तथ्य संकलन. प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्यासाठी दोन्ही पद्धतींचा अवलंब केला आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्याची निवड केलेली आहे. यवतमाळ जिल्ह्यात एकूण तालुके 16 आहेत. हा अभ्यास 2016-2021 या दरम्यान केलेला आहे. सदरील अभ्यासासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला. या पद्धतीमधील कोटा पद्धतीचा अवलंब करून अध्ययन केले. एकूण 320 लाभार्थी महिलांची निवड नमुना म्हणून केलेली आहे.

पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर परिणाम पडलेला आहे. हा परिणाम विशेषतः तीन प्रमुख घटकात अभ्यासलेला आहे. सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक. आरोग्याच्या संदर्भात असे म्हणता येईल की, महिला गॅसवर स्वयंपाक करीत असल्यामुळे आरोग्याचे प्रश्न कमी झाले आहेत. महिलांच्या नावावर गॅस आल्यामुळे महिला आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. पंतप्रधान उज्ज्वला योजनेची निश्चित उद्दिष्ट्ये साध्य होत आहेत. अध्ययनाची जी उद्दिष्टये आहेत त्यांची पूर्तता होत आहे, असे अधोरेखित करता येईल. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेत ग्रामीण दारिद्रय रेषेखालील असलेल्या कुटुंबातील महिलेच्या नावाने एलपीजी जोडणी मोठ्या प्रमाणात दिलेली आहे. ग्रामीण महिलांना चुलीच्या बंधनातून मुक्त करणे हे उद्दिष्ट सफल होत आहे. देशातील गावे प्रदुषणमुक्त दिशेनी वाटचाल सुरू आहे. किंबहुना पर्यावरण संतुलन कायम राहण्यास ही योजना महत्त्वाची भूमिका बजावित आहे. ग्रामीण महिलांनी वृक्षतोड थांबविल्यामुळे पर्यावरण संरक्षणाला हातभार लागला आहे. संतुलित पर्यावरणात महिलांचे आरोग्य निरोगी राहत आहे. शासन देखील महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यास कटिबद्ध् दिसत आहे. म्हणून उज्ज्वला योजना सुलभ करून

योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना जास्तीत जास्त कसा होईल यासाठी शासन प्रयत्नशील मार्गाने कार्य करीत आहे.

वर्तमानात देखील ग्रामीण भागात इंधनाला विशेष महत्त्व आहे. बहुतांश घरात गॅस जोडणी केलेली आहे. परिणामी गॅस सिलेंडरची किंमत सातत्याने वाढत आहे. त्यामुळे गॅस ऐवजी पारंपरिक इंधनाचा वापर करणाऱ्या कुटुंबाची संख्या वृद्धिंगत होत चालली आहे. म्हणजेच मूळ इंधनाकडे कुटुंब पुन्हा आकर्षित झाले आहे. ग्रामीण भाग कृषी व जंगल व्याप्त आहे. अशा ठिकाणी इंधन सहज व विनाशुल्क प्रमाणात उपलब्ध होत असते. त्यामुळे गॅसचा वापर करणे त्यांना आर्थिक भार वाटत आहे.

## संदर्भसूची

१. *बन्सीबिहारी पंडित, चव्हाण नूतन (जानेवारी 2017), "परिणामकारक संशोधन प्रस्ताव व अहवाल", जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती*

२. *पाटील जगन्नाथ,* ***https://mr.vikaspedia.in/socialwelfare/govt_schemes***

३. *करे बिभीषण, (जुलै 2015), "सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे", औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.*

४. *कार अभिषेक (2020), "कर्नाटक मधील कोप्पल जिल्ह्यातील पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेच्या लाभार्थी महिलांचा अभ्यास"*

५. *श्रीवास्तव बीना (2017), "प्रधानमंत्री उज्ज्वला योजना प्रभाव आंकलन", अटलबिहारी वाजपेयी सुशासन एवं नितीविश्लेषण संस्थान, भोपाल"*

६. *जाधव मयुरा, रहाटकर विजया (संपा), (जानेवारी 2019), "साद".*